महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा या विद्यापीठातील B.Ed. (ODL) या पदवीस राज्यातील बी.एड पदवीशी समकक्षता प्रदान करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## उच्च व तंत्र शिक्षण विभाग
## शासन निर्णय क्रमांकः बीएड-४६१६/प्र.क्र.१८२/मशि-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: ०७ एप्रिल, २०१८.

**वाचा :-**

१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.समक-१०९९/१३४/मशि-४, दिनांक १४ जून, १९९९.
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, परिपत्रक क्र.एसएसएन-२००५/(१२/२००५)/माशि-२, दिनांक ९ जून, २००५.
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.आरजीडी-१५११/प्र.क्र.८९/२०११/१३, दिनांक २३ ऑगस्ट, २०११.
४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक, क्र.एसएसएन-२०११/(२९/११)/माशि-२, दिनांक २१ डिसेंबर, २०११.

**प्रस्तावना :-**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा हे विद्यापीठ संसदेने मंजुरी दिलेल्या “द महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय ॲक्ट, १९९६ (१९९७ चा अधिनियम क्र.३)” अन्वये स्थापन झालेले विद्यापीठ आहे. या विद्यापीठास राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, पश्चिम क्षेत्रिय समिती, भोपाळ यांनी त्यांचे आदेश क्र.F.No.APP1506/217th/B.Ed./2015/132047, दिनांक २८.२.२०१५ अन्वये बी.एड (ओडीएल) या अभ्यासक्रमास मान्यता दिलेली आहे.

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये केंद्रीय किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियमाद्वारे भारतातील विद्यापीठाने दिलेल्या पदव्या/पदविका आणि संसदेने अधिनियमाद्वारे शैक्षणिक संस्था स्थापित केल्या आहेत किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाने घोषित केलेल्या मानीव विद्यापीठानी प्रदान केलेल्या पदवी/पदविकांना समकक्ष दर्जा देण्यास मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्र.२ येथील शासन परिपत्रकान्वये इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली, या विद्यापीठातून तसेच, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठातून पूर्ण शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वायत्त संस्था व संस्था इत्यादींच्या विविध पदविका, पदवी व पदव्युत्तर पदव्यांना केंद्र शासनाच्या मानव संसाधन विकास (शिक्षण विभाग) मंत्रालयाकडून, केंद्र शासनाच्या सेवेतील नियुक्तीसाठी वेळोवेळी प्रदान केलेली व भविष्यात प्रदान केली जाणारी समकक्षता राज्य शासनाच्या सेवेतील नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच,

संदर्भ क्र.४ येथील शासन परिपत्रकान्वये मौलाना आजाद उर्दु राष्ट्रीय विद्यापीठ, हैद्राबाद या विद्यापीठातून बी.एड (नियमित)/बी.एड (पत्रद्वारा) उर्दु माध्यम हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या अर्हताप्राप्त शिक्षकांच्या नियुक्ती व पदोन्नतीस मान्यता देण्यात आलेली आहे. या बाबी विचारात घेता, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा या विद्यापीठातील B.Ed. (ODL) या पदवीस राज्यातील नियमित बी.एड पदवीशी समकक्षता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:-

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा या संसदेने मंजुरी दिलेल्या “द महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय ॲक्ट, १९९६ (१९९७ चा अधिनियम क्र.३)” अन्वये स्थापन झालेल्या विद्यापीठातील B.Ed. (ODL) या पदवीस सन २०१५-१६ पासून राज्यातील नियमित बी.एड पदवीशी समकक्षता प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०७१२३३०७४८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Hariram V Parhate

Digitally signed by Hariram V Parhate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8bfd656b321bf6c348564562d46cd2934b62b770484625206559a2c204e56cb8, serialNumber=d01f16685aedf1abc9cfd58347280b4c4cb8d304afd1d413884ef4d91aa1462d, cn=Hariram V Parhate
Date: 2018.04.07 12:33:11 +05'30'

**( ह. व्यं. पऱ्हाते )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
३) सर्व सह संचालक, उच्च शिक्षण (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत),
४) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक (शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत)
५) प्राचार्य, सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्यामार्फत),
६) कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे (संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्यामार्फत)
७) निदेशक, दूर शिक्षा निदेशालय, महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा, ता.जि.वर्धा,
८) निवडनस्ती-मशि-२.